4 N.A.6811(Legal)

IOP

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे- ४०१ १०१

जा.क्र.मिभा/मनपा/नर/3059/2008-09  दिनांक- 9/2/2009

प्रति,
जमीन/जागामालक - श्री. नारायण सिताराम व ईतर ११
अधिकार पत्रधारक - श्री. गुलाम रसुल मोहम्मद अली शेख व ईतर ३
द्वारा- वास्तुविशारद - मेसर्स बॉम्बे आर्किटेक्चरल कन्सलटंट

विषय- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे — घोडबंदर सर्वे क्र./ हिस्सा क्र. २६/३
या जागेत नियोजित बांधकाम करण्यासाठी जागेस अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांना सादर करणेसाठी नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ- १. आपला दि.१५/१०/२००८ चा अर्ज.
२. मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील १०(३), १०(५) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.३००/- च्या स्टॅम्प पेपरवर दिलेले शपथपत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील मौजे — घोडबंदर सर्वे.क्र./हिस्सा.क्र. २६/३ मधील जागेस अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावयाच्या नकाशास खालील अटीस अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) विषयांकित जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून अकृषिक परवानगी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ (प्रकरण १२ सह) विहीत नमुन्यात बांधकाम प्रारंभपत्रासाठी अर्ज करण्याची व बांधकाम प्रारंभपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी आपणांवर राहील. सदर नाहरकत दाखल्याची मुदत एक वर्षासाठी आहे. सदर नाहरकत दाखल्याच्या आधारे जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही, अन्यथा बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनाधिकृत ठरवुन विहीत कार्यवाही करण्यात येईल. तसेच बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी विद्युतपुरवठा करणेबाबत महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

२) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडील मोजणी नकाशा सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.२५/०६/२००८ रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

४) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी इस्टेट इंव्हेस्टमेंट कं. प्रा.लि. यांचेकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

५) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी या विषयांकित जागेबाबतचे सन १९९३ पासूनचे सर्व फेरफार उतारे सादर करणे बंधनकारक राहिल.

६) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी ७/१२ उता-यावर इतर अधिकारात अतिरिक्त क्षेत्र नमुद आहे. त्याअनुषंगाने प्रथम नागरी जमीन कमाल धारणा कार्यालयाकडून नाहरकत दाखला प्राप्त करणे आवश्यक राहिल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका